**प्रेस नोट**

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १७.१२.२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | सुनिल नारायण भागवत, वय ३० वर्षे, आय.टी.असीस्टंट, (कंत्राटी), नेमणूक : कार्यालय दुय्यम निबंधक श्रेणी–१, भातकुली, जि.अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | १७.१२.२०२१ चे १५.२० वा.ते १५.३० वा. दरम्यान |
| ४ | स्विकारलेली लाच रक्कम | १००/– रुपये |
| ५ | घटनास्थळ | दुय्यम निबंधक कार्यालय, भातकुली, जि.अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांचे वडीलांचे नावे खरेदी केलेल्या प्लॉटचे खरेदीची इंडेक्स – २ ची नक्कल देणेकरीता दुय्यम निबंधक श्रेणी–१ कार्यालय, भातकुली, जि. अमरावती येथील कर्मचारी श्री.भागवत हे २००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक १७.१२.२०२१ रोजी तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान दुय्यम निबंधक श्रेणी–१ कार्यालय, भातकुली, जि.अमरावती येथील श्री.भागवत यांनी तक्रारदार यांना त्यांचे वडीलांचे नावे खरेदी केलेल्या प्लॉटचे खरेदीची इंडेक्स – २ ची नक्कल देणेकरीता तडजोडीअंती १००/– रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान श्री.सुनील भागवत, आय.टी. असीस्टंट, (कंत्राटी), नेमणूक : कार्यालय दुय्यम निबंधक श्रेणी–१, भातकुली, जि.अमरावती यांनी तक्रारदार यांचेकडून १००/– रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे.फ्रेजरपुरा, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पो.नि.सतीष उमरे, पो.ना.सुनिल व–हाडे, युवराज राठोड, पो.कॉ.अभय वाघ यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,
टोल फ्रि नंबर – १०६४

(सतीष उमरे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

Scanned with CamScanner